(३०३)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स-II, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-२/झोपुआ/ ४०५ /२०२०
दिनांक : १७ /०३/२०२०

# "झोपडपट्टी पुनर्वसन आदेश"

**(महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना)**

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि.३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे; आणि

ज्याअर्थी, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद गाव बोपोडी, स.नं.२५ या मिळकतीवरील झोपडपट्टी क्षेत्रावर क्षेत्रफळ ९९१६.०० चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे 'सदर मिळकत' असा करणेत येत आहे) हे क्षेत्र या प्राधिकरणाकडील पुणे महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या यादीमध्ये समाविष्ट करणेत आलेले आहे; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.रेनबो डेव्हलपर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.२८/०१/२०१९ रोजी झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव दाखल करणेत आलेला आहे; आणि

ज्याअर्थी, सदर क्षेत्र तत्कालिन सक्षम अधिकारी, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी महाराष्ट्र शासन राजपत्र व दि.१६/०८/१९७३, दि.१६/०१/१९८६ व दि.०३/१२/१९८७ अनुक्रमे पृष्ठ क्र.१७२८, १७५ व २७७१ वर प्रसिध्द अधिसुचनेद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषीत केले आहे; आणि

ज्याअर्थी, खालील अनुसुचीमधील क्षेत्र खाजगी मालकीचे असून या क्षेत्रावरील ७०% झोपडीधारकांनी विकसक मे.रेनबो डेव्हलपर्स यांना संमती दिलेली आहे. सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.११/०९/२०१४ च्या नियमावलीतील नियम क्र.SR-५(१) अन्वये नमूद केलेल्या तरतुदीनुसार ३ वर्षांच्या प्राधान्य असलेल्या कालावधीत जमिन मालकाने पुनर्वसनाचा प्रस्ताव दाखल केला नसल्याने सदरचे क्षेत्र संपादित करणे/भूसंपादन करणे आवश्यक आहे,

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील नमूद तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले हे क्षेत्र या आदेशाद्वारे **'झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र'** म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित करीत आहे. आणि

या प्राथमिक आदेशाद्वारे मालकी हक्क प्राप्त असलेले व्यक्ती / संस्था यांना असे सुचित करीत आहे की, त्यांनी उक्त क्षेत्र पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करणेबाबत त्यांची कोणतीही सुचना/आक्षेप/हरकत असल्यास, ती सदरचा आदेश प्रसिध्द करण्यात आल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे-४११०१६ या कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात आवश्यक ती कागदपत्रे आणि पुराव्यांसह सादर करावी. सबळ पुराव्याशिवाय दाखल केलेले तसेच विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही आक्षेप/हरकती/सुचना/दावे या कार्यालयाकडे स्वीकारले जाणार नाहीत अथवा विचारात घेतले जाणार नाहीत, याची जाणीव याद्वारे करुन देण्यात येत आहे.

उपरोक्त विहीत मुदतीत मालकी हक्क प्राप्त असलेल्या व्यक्ती/संस्था यांचेकडून प्राप्त आक्षेप/हरकती/सुचना/दावे यावर त्यांना म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल. त्यांचे म्हणणे व दाखल केलेले कागदपत्र आणि पुरावे विचारात घेवून उक्त अधिनियमाच्या कलम ३क(१) अन्वये सदरचा आदेश कायम करण्याबात व अधिसुचनेमध्ये समाविष्ट क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषीत करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव :** बोपोडी, स.नं.२५.

**महानगरपालिका क्षेत्र :** पुणे महानगरपालिका

| गाव | स.नं. / सि.स.नं. | जमीनीची मालकी | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| बोपोडी | स.नं.२५ | खाजगी | ९९१६.०० चौ. मी. | पुर्वेस - ला.स.नं.२४ | |
| | | | | पश्चिमेस - लागू गावठाण | |
| | | | | दक्षिणेस - ला.स.नं.२६ | |
| | | | | उत्तरेस - ला.स.नं.१ | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

17.3.2020

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
**दिनांक :-** १७/०३/२०२०

**प्रत :-** रजि. पोस्ट द्वारे
१. जमिन मालक
२. उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.२, झोपुप्रा, पुणे यांना सुचित करण्यात येते की या आदेशाच्या प्रती योजनाक्षेत्र/झोपडपट्टी क्षेत्रात डकवून प्रसिध्द करण्यात याव्यात व प्रसिध्दी अहवाल प्रकरणात समाविष्ट करण्यात यावा.

**प्रत :-** माहिती व उचित कार्यवाहीसाठी
१. मा.जिल्हाधिकारी, पुणे
२. मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना गवनि/झोनिपु विभागाचे माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.
३. महापालिका सहाय्यक आयुक्त, औंध-बाणेर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे यांना माहितीस्तव.
४. व्यवस्थापक, मुद्रणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६.
वरील आदेश महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करुन त्याच्या ५ प्रती या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात ही विनंती.
५. विकसक- मे.रेनबो डेव्हलपर्स, ऑफिस नं.७०१, प्राईड पर्पल ॲकॉर्ड, महाबळेश्वर हॉटेल जवळ, बाणेर, पुणे-४११०४५.